देशोन्नती 29/07/2022

# गुन्हेगाराकडून २ गावठी पिस्तूल व १ जिवंत काडतूस जप्त



देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ■ शहरात २७ जुलै रोजी राबविण्यात आलेल्या ऑल आऊट ऑपरेशन व नाकाबंदी दरम्यान शिवाजीनगर पोलिस ठाण्याच्या डीबी पथकाने अण्णाभाऊ साठे चौकात एकास ताब्यात घेऊन त्याच्याकडून दोन गावठी पिस्तूल व दोन जिवंत काडतुस जप्त केले.

## शिवाजीनगर ठाण्याच्या डी.बी. पथकाची कारवाई

पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांचे आदेशाने २७ जुलै रोजी लावलेल्या ऑलआऊट ऑपरेशन व नाकाबंदीदरम्यान पोलीस अधीक्षक यांनी पोलीस स्टेशन हद्दीतील अभिलेखावरील गुन्हेगारांना चेक करुन कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याने पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथील पोलीस निरीक्षक नितीन काशीकर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाने आरोपी चेकिंगदरम्यान मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे आण्णाभाऊ साठे चौकात सापळा रचून जबरी चोरीचे प्रयत्नात प्राणघातक हत्यारासहीत असलेला संशयीत आरोपी तेजिंदरसिंघ टप्पेवाले (२३) वर्ष, रा. सखोजीनगर यास ताब्यात घेवून त्याची अंगझडती घेतली असता त्याचे अंगझडतीत दोन गावठी पिस्टल व एक जिवंत काडतूस हस्तगत केल्या.

या पथकात उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रसेन देशमुख यांचे व पोलीस निरीक्षक नितीन काशिकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे सपोनि रवी वाहुळे, पोउपनि सोनकांबळे, पोहेकॉ इब्राहिम, पोना रवि बामणे, पोना दिलीप राठोड, पोशि देविसिंघ सिंगल, पोशि शेख अझहर व पोशि दत्ता वडजे यांनी कामगिरी पार पाडली.